**महाराष्ट्र शासन**

**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई- ४०० ०२३**

**दुरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३ **फॅक्स क्र.** :- २२६४४६३८

**Website:**- www.dol.maharashtra.gov.in **E-mail:**- director.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.३२/निविआ/२०१८-१९/२१३०-२२०८ दिनांक :- २३.०५.२०१८

**अनिवार्य खर्च** **ई-मेल / स्पीड पोस्ट**

**सार्वजनिक ग्रंथालये निधी वितरण आदेश क्र.२०१८-१९/०१**

प्रति,

**१) जिल्हा ग्रंथालय अधिकारी,**
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,
अमरावती/ वाशिम/उस्मानाबाद/औरंगाबाद/जालना/नांदेड/परभणी/बीड/लातूर/हिंगोली/
गडचिरोली/गोंदिया/अहमदनगर/जळगाव/धुळे/नंदुरबार/नाशिक/कोल्हापूर/पुणे/सांगली/सातारा/
/सोलापूर/ठाणे/मुंबई उपनगर/मुंबई शहर/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग.

**२) जिल्हा ग्रंथपाल,**
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,
अकोला/बुलढाणा/यवतमाळ/चंद्रपूर/नागपूर/भंडारा/वर्धा.

**विषय** :- शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सन २०१७-१८ मधील परिरक्षण अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित अनुदान अदा करण्यासाठी मासिक निधी वितरण प्रणालीमध्ये निधी वितरण.

**लेखाशिर्ष** :- मागणी क्र.डब्ल्यू-४
२२०५, कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये,
(०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य,
(०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) **(२२०५०२९८)**
३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

**संदर्भ** :- १) संचालनालयाचे पत्र क्र.१४३९२-१४४३२, दिनांक १७.०३.२०१८
२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.माराग्रं-२५२७/(९२/१८)/साशि-५, दिनांक १९ मे, २०१८

**आदेश** :-

सन २०१८-१९ मध्ये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी '२२०५०२९८' या लेखाशिर्षांतर्गत रु.१२५,००,००,०००/- ( रुपये एकशे पंचवीस कोटी फक्त ) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पित निधी खर्च करण्याची मर्यादा ७०% विहित करण्यात आली आहे. त्यानुसार याबाबत शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयानुसार '२२०५०२९८' या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीच्या ७०% म्हणजे रु.८७,५०,००,०००/- (रुपये सत्त्याऐंशी कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन मान्यता प्राप्त झालेली आहे.

वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये अनिवार्य खर्चाच्या योजनांसाठी अर्थसंकल्पीय निधीपैकी ९०% निधी BDS वर वितरीत करण्यात आल्याने सन २०१७-१८ मध्ये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या नियमित परिरक्षण अनुदानाचा दुसरा हप्ता पूर्णत: प्रदान करणे संचालनालयास शक्य झाले नाही. त्यामुळे परिरक्षण अनुदानासाठी सन २०१८-१९

( कृ.मा.प. )

मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून सन २०१७-१८ मधील परिरक्षण अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित अनुदान अदा करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांना निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याबाबत विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांकडून संचालनालयाचे संदर्भ क्र.१ अन्वये माहिती प्राप्त करुन घेण्यात आली. प्राप्त माहिती व मागणीनुसार सन २०१८-१९ मध्ये परिरक्षण अनुदानासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या अधीन राहून सन २०१७-१८ मधील परिरक्षण अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित अनुदान अदा करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हा निधी 'मागणी क्र.डब्ल्यू-४, २२०५, कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य, (०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५०२९८) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)' या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा व सदर खर्च वितरीत निधीच्या मर्यादेत ठेवावा.

जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना नियमानुसार अनुदान वितरणाची कार्यवाही वेळेत करण्यात यावी. सहाय्यक अनुदानाचे देयक कोषागारात सादर करताना आहरण व संवितरण अधिकारी यांनी सहायक अनुदान मंजूरीचे आदेश सशर्त किंवा बिनशर्त अनुदानाचे आहेत हे देयकावर नमूद करुन याबाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सशर्त किंवा बिनशर्त शिक्का उमटविणे आवश्यक आहे. जेणेकरुन अशी देयके पारित करताना कोषागार कार्यालयास सहायक अनुदान मंजूरीचे आदेश सशर्त किंवा बिनशर्त अनुदानाचे आहेत हे समजू शकेल.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना ECS/DBT/NEFT द्वारे ग्रंथालयाचे बँक खात्यामध्ये अनुदान जमा करण्याची कार्यवाही जिल्हा ग्रंथालय अधिकारी / जिल्हा ग्रंथपाल यांनी विनाविलंब करावी.

**आहरित केलेले अनुदान कोणत्याही परिस्थितीत ( Any How Condition ) दि.३१.०३.२०१९ पूर्वी वितरीत करण्यात यावे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी / जिल्हा ग्रंथपाल यांची राहील.**

**( किरण गं. धांडोरे )**
**ग्रंथालय संचालक**

**सहपत्र** :- निधी वितरण आदेशाचे सहपत्र.

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२. कोषागार अधिकारी, अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम/उस्मानाबाद/औरंगाबाद/जालना/नांदेड/परभणी/बीड/लातूर/हिंगोली/गडचिरोली/गोंदिया/चंद्रपूर/नागपूर/भंडारा/वर्धा/अहमदनगर/जळगाव/धुळे/ नंदुरबार/नाशिक/कोल्हापूर/पुणे/सांगली/सातारा/सोलापूर/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग.
३. अपर कोषाधिकारी, उपकोषागार कार्यालय, कोंकण भवन, नवी मुंबई.
४. कार्यासन - ५.

**प्रत** :-

१) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग(साशि-५), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२) सहाय्यक ग्रंथालय संचालक, अमरावती/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/पुणे/मुंबई विभाग - यांना निदेशित करण्यात येते की, आपण विभागाचे नियंत्रक अधिकारी असल्याने, आपल्या विभागातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांना अनुदान निर्धारण व वितरण करण्याबाबत काही अडचणी उदभवल्यास त्यांना मार्गदर्शन करावे. तसेच जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानाचे वितरण वेळेत झाले किंवा कसे ? याबाबतचा आढावा घेऊन त्याचा अहवाल ग्रंथालय संचालनालयास सादर करावा.

**ग्रंथालय संचालनालयाचे निधी वितरण आदेश क्र.३२/निविआ/२०१८-१९/२१३०-२२०८,**
**दिनांक २३.०५.२०१८ सोबतचे सहपत्र.**

(रुपये हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | डी.डी.ओ.कोड | या आदेशानुसार करावयाचे निधी वितरण (रु.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | अकोला | 6201002187 | ८६४५.५२० |
| २ | अमरावती | 6101002186 | ७२६४.३२१ |
| ३ | बुलडाणा | 6301002187 | ५३८४.२१३ |
| ४ | यवतमाळ | 6401002187 | ५८२०.११८ |
| ५ | वाशिम | 6501002186 | ४३१३.३२२ |
| ६ | उस्मानाबाद | 3501002186 | ६७७९.५७५ |
| ७ | औरंगाबाद | 3101002186 | ७६५९.७९५ |
| ८ | जालना | 3601002186 | ६०३९.३९६ |
| ९ | नांदेड | 3401002186 | १३४५६.१७३ |
| १० | परभणी | 3201002186 | ६५२२.१९५ |
| ११ | बीड | 3301002186 | ९३१९.०९३ |
| १२ | लातूर | 3701002186 | १३४२६.५८५ |
| १३ | हिंगोली | 3801002186 | ३१२६.६७८ |
| १४ | गडचिरोली | 4901002186 | २२५०.२३५ |
| १५ | गोंदिया | 4401002186 | २९९४.६५९ |
| १६ | चंद्रपूर | 4801002187 | ३४५८.३३८ |
| १७ | नागपूर | 4601002187 | ३९९५.५८२ |
| १८ | भंडारा | 4701002187 | ३३७३.८७१ |
| १९ | वर्धा | 4501002187 | २६१०.३१७ |
| २० | अहमदनगर | 5401002186 | ८१७४.३०६ |
| २१ | जळगाव | 5301002186 | ७०९७.२०२ |
| २२ | धुळे | 5201002186 | ३९७८.४८४ |
| २३ | नंदुरबार | 5501002186 | १७७१.५६० |
| २४ | नाशिक | 5101002186 | ५९७२.७८४ |
| २५ | कोल्हापूर | 2601002186 | १२८२७.१३१ |
| २६ | पुणे | 2201002186 | १०००७.१२६ |
| २७ | सांगली | 2401002186 | ८६५६.४८५ |
| २८ | सातारा | 2301002186 | ६७५१.२६१ |
| २९ | सोलापूर | 2501002186 | २१२९९.९८३ |
| ३० | ठाणे | 1201002186 | ४१६०.३४८ |
| ३१ | मुंबई उपनगर | 7101002186 | ९८५.२७० |
| ३२ | मुंबई शहर | 7101012186 | १३०७.७८२ |
| ३३ | रत्नागिरी | 1401002186 | ३८६९.६९९ |
| ३४ | रायगड | 1301002186 | २०५३.९४७ |
| ३५ | सिंधुदुर्ग | 1501002186 | ३७२९.९४० |
| | | **एकूण** | २१९०८३.२९४ |

( किरण गं.धांडोरे )
**ग्रंथालय संचालक**